ePaper

## भीक मागताना लाज वाटते; पंतप्रधान शाहबाज शरीफ

वर्ष - 9 I अंक - 156 UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™

WWW.MAHAENEWS.COM रविवार, दि. 1 फेब्रुवारी 2026 पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती MAHAENEWS.COM लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!






पान 2 वरुन...

पुणेकरांवर मिळकत कराचा बोजा वाढणार?

## उपमुख्यमंत्रीपदी सुनेत्रा पवार : राष्ट्रवादीच्याही आता सर्वेसर्वा

# महाराष्ट्रात सुनेत्रा पर्व!

**महाईन्यूज । मुंबई**

**उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे २८ जानेवारी रोजी सकाळी विमान अपघातात निधन झाले. पवार कुटुंबासह संबंध महाराष्ट्रासाठी हा मोठा धक्का होता. बारामती आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासाठी ही मोठी हानी असल्याचे मानले जाते. पक्ष आणि पवार कुटुंबात आलेल्या रितेपणातून वाट काढण्याचा प्रयत्न पक्षाकडून केला जात आहे. याचसाठी अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांची निवड पक्षाकडून उपमुख्यमंत्रीपदी करण्यात आली आहे. सुनेत्रा पवार यांनी राजभवनात ११ वे उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली.**



सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर सभागृहात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेत्यांनी ‘अजित दादा अमर रहे’ अशा घोषणा दिल्याचे पाहायला मिळाले. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह भाजपा आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोन्ही पक्षांच्या नेत्यांच्या उपस्थितीत हा शपथविधी पूर्ण झाला.

अजित पवार यांच्या निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या विधिमंडळ गटनेतेपदी सुनेत्रा पवार यांची एकमताने निवड करण्यात आली. सुनेत्रा पवार यांची विधिमंडळ गटनेतेपदी निवडीचा प्रस्ताव दिलीप वळसे-पाटील यांनी मांडला, तर छगन भुजबळ यांच्याकडून या प्रस्तावाला अनुमोदन देण्यात आले.

राज्यात आतापर्यंत १० जणांनी उपमुख्यमंत्रीपद भूषविले आहे. पण उपमुख्यमंत्रीपद भूषविणाऱ्या सूनेत्रा पवार या पहिल्याच महिला उपमुख्यमंत्री आहेत.

अजित पवार यांचे महायुती सरकारमधील स्थान, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेतृत्व आणि एकूणच पक्षाच्या हितासाठी त्यांचा उत्तराधिकारी लवकर नेमणे गरजेचे आहे, अशी भावना राष्ट्रवादीच्या नेत्यांमध्ये आहे. त्यामुळेच निधनानंतर अवघ्या दोन दिवसांत राष्ट्रवादी काँग्रेस आणि पवार कुटुंबाला यातून मार्ग काढणे क्रमप्राप्त ठरत आहे. अजित पवारांचा उत्तराधिकारी त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवारच असाव्यात असा एक मतप्रवाह राष्ट्रवादीच्या नेत्यांमध्ये आहे.

## धाराशिवच्या लेकीवर उपमुख्यमंत्री पदाची जबाबदारी

धाराशिवचा जावाई आहे असा उल्लेख अजित पवार आवर्जून करत असत. आता अजित पवार यांच्या अपघाती निधनाने धाराशिवच्या लेकीवर दु:खाचा डोंगर कोसळलेला असतानाही राज्याची मोठी जबाबदारीही आली आहे. धाराशिवमध्ये जन्मलेल्या आणि छत्रपती संभाजीनगरच्या सरस्वती भुवनमध्ये शिकलेल्या सुनेत्रा पवार यांच्याकडे शनिवारी उपमुख्यमंत्री पदाची जबाबदारी सोपविण्यात आली. सुनेत्रा पवार यांचा जन्म धाराशिव तालुक्यातील ऐतिहासिक ‘तेर’ गावचा. बाजीराव पाटील यांच्या या कन्येला माहेरातूनच राजकारणाचे बाळकडू मिळाले आहे. बाजीराव पाटील यांच्या तिसऱ्या पत्नी झालेल्या पाच मुलांपैकी सुनेत्रा पवार या एक. तेरचा पाटील हा मोठा परिवार. घरात डॉ. पद्मसिंह पाटील यांचा राजकीय वारसा. ३० डिसेंबर १९८५ रोजी सुनेत्रा पवार यांचा अजित पवार यांच्याशी झाला. हा विवाह म्हणजे राजकारणातील दोन मोठ्या घराण्यांचे मिलन होते. तत्कालीन मातब्बर नेते डॉ. पद्मसिंह पाटील यांनी स्वतः हा प्रस्ताव शरद पवार यांच्याकडे ठेवला होता. सुनेत्रा पवार या बाजीराव पाटील यांच्या तिसऱ्या पत्नीच्या कन्या. दहा बहणी आणि तीन भाऊ असा हा परिवार. डॉ. पद्मसिंह पाटील यांनी आपल्या या धाकट्या बहिणीची नेहमीच पित्यासमान काळजी घेतली. आजही माहेरचा हा मोठा आधार त्यांच्या पाठीशी ठामपणे उभा आहे. डॉ. पद्मसिंह पाटील वार्धक्यामुळे थकलेले असले, तरी त्यांचे सुपुत्र आणि भाजप आमदार राणाजगजितसिंह पाटील आपल्या आत्याला सावरण्यासाठी बारामतीमध्ये सोबत आहेत. बी.कॉम. पर्यंत शिक्षण झालेल्या सुनेत्रा पवार यांच्याकडे प्रशासकीय समज आणि शांत संयमी स्वभाव असल्याचे धाराशिवकर आवर्जून सांगतात.

# पुणेकरांवर मिळकत कराचा बोजा वाढणार?

## मिळकत कर दहा टक्क्यांनी वाढीचा प्रस्ताव स्थायीसमिती पुढे

महाईन्यूज । पुणे

**एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी व एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्नमेंटतर्फे २२ वे 'भारत अस्मिता राष्ट्रीय पुरस्कार' जाहिर करण्यात आले आहेत. भारत अस्मिता राष्ट्रीय पुरस्काराद्वारे विविध क्षेत्रांमध्ये मोलाची कामगिरी बजावणाऱ्या व्यक्तींच्या कार्याची माहिती तरुण पिढीला व्हावी व या पिढीने त्या मार्गावर चालण्याची जिद्द बाळगावी हे या पुरस्काराचे उद्दिष्ट आहे.**

### नवीन सदस्य घेणार निर्णय

करवाढीचा प्रस्ताव प्रशासक राजवटीत मंजूर झाला तर २० फेब्रुवारीपूर्वी त्याला मुख्य सभेत मान्यता घ्यावी लागणार आहे. अद्याप महापालिकेचे नवे सभागृह अस्तित्वात आलेले नाही. त्यासाठी ९ फेब्रुवारीला खास सभा बोलाविण्यात आली आहे. त्या सभेनंतर फेब्रुवारी महिन्याची सभा प्रशासनाला २० तारखेच्या आधी घ्यावी लागणार आहे. तरच, मिळकत करवाढीबाबत निर्णय घेता येणार आहे. प्रशासन उत्पन्नवाढीसाठी आग्रही असले तरी पुणेकरांनी महापालिकेत विक्रमी बहुमत देत एकहाती सत्ता दिल्यानंतर भाजप तातडीने करवाढीचा निर्णय घेण्याची शक्यता कमी आहे.




महापालिकेने नऊ वर्षांपूर्वी मिळकत कर वाढवला होता.त्यानंतर अद्याप करवाढ करण्यात आलेली नाही. या पार्श्वभूमीवर महापालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी प्रशासनाने शहरातील मिळकतींना सरसकट १० टक्के करवाढीचा प्रस्ताव स्थायी समितीत दाखल केला. मात्र, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे बैठक तहकूब करण्यात आल्याने येत्या सोमवारी (दि. २) होणाऱ्या स्थायीच्या बैठकीत या प्रस्तावाला मंजुरी मिळणार की नवीन स्थायी समितीसमोर हा प्रस्ताव जाणार हे पाहावे लागणार आहे.

महापालिका प्रशासन दरवर्षी आर्थिक वर्षासाठी अंदाजपत्र तयार करते. त्यापूर्वी त्या वर्षी करवाढ करायची की नाही, याबाबत २० फेब्रुवारीपूर्वी निर्णय घेणे आवश्यक असते. त्यानुसार महापालिका प्रशासनाने सरसकट १० टक्के मिळकत करवाढीचा प्रस्ताव स्थायी समितीसमोर आयत्या वेळी ठेवला होता.मात्र,




उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे बैठक तहकूब करण्यात आली. आता महापालिका आयुक्त येत्या सोमवारी (दि. २) होणाऱ्या स्थायीच्या बैठकीत या प्रस्तावाला मंजुरी देणार की नवीन स्थायी समिती हा निर्णय घेणार हे पाहावे लागणार आहे.

दरम्यान, ९ वर्षांपूर्वी मिळकत करात वाढ झाली होती. त्यानंतर विविध निवडणुकांचा विचार करून सत्ताधाऱ्यांनी मिळकत कर वाढ केली नाही. महापालिका सभागृह विसर्जित झाल्यानंतर प्रशासक राजमध्येही करवाढ करण्यात आली नाही. आता मात्र, सुरू असलेले मोठे प्रकल्प, वाढलेला वेतनाचा खर्च तसेच वेगवेगळ्या स्रोतांमधून मिळणाऱ्या उत्पन्नातील घट लक्षात घेऊन प्रशासनाने ही दरवाढ प्रस्तावित केली असून, त्यामुळे ३०० कोटींचे उत्पन्न वाढण्याचा प्रशासनाला विश्वास आहे.

# राज्यात दोन महिन्यांत आणखी ३० लाख टन साखर उत्पादनाचा अंदाज

महाईन्यूज । पुणे

**देशभरात उसाचे गाळप वेगाने सुरू असून आतापर्यंत १९३ लाख टन साखरेचे उत्पादन झाले आहे. राज्यात २०६ सहकारी व खासगी कारखान्यांच्या माध्यमातून आतापर्यंत सुमारे ७९ लाख टन साखर उत्पादित झाली असून पुढील दोन महिन्यांच्या काळात आणखी ३० लाख टन साखरेचे उत्पादन होऊ शकते, असा अंदाज राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाने व्यक्त केला आहे. महाराष्ट्र व कर्नाटकमधील गाळप हंगाम मार्चअखेर संपण्याची शक्यता असून उत्तर प्रदेशातील गाळपहंगाम मेअखेरपर्यंत चालेल. त्यानुसार देशभरात ३०० ते ३१५ लाख टन साखर उत्पादित होऊ शकेल, असा अंदाजही महासंघाने व्यक्त केला आहे.**

देशभरात नोव्हेंबर महिन्याच्या दरम्यान सुरू झालेला चालू साखर हंगाम वेगाने पुढे जात असून आतापर्यंत मोठ्या प्रमाणावर उसाचे गाळप आणि साखर उत्पादन झाले आहे. उपलब्ध आकडेवारीनुसार, देशभरात आतापर्यंत एकूण २ हजार २१९ लाख टन उसाचे गाळप पूर्ण झाले असून त्यातून १९३ लाख टन साखरेचे उत्पादन करण्यात आले आहे. ही आकडेवारी मागील साखर हंगामाच्या तुलनेत लक्षणीय वाढ दर्शवणारी आहे. गेल्या साखर हंगामाचा विचार केला असता, याच कालावधीत देशभरात १ हजार ८५६ लाख टन उसाचे गाळप झाले होते. त्या वेळी सरासरी ८.९० टक्के साखर उतारा मिळाला होता आणि त्यातून १६५ लाख टन साखरेचे उत्पादन झाले होते. यंदा मात्र आतापर्यंतचा साखर उतारा ९.११ टक्के इतका नोंदवला गेला असून, ही वाढ साखर उद्योगासाठी दिलासादायक ठरत आहे.

सध्या देशभरात साखर उतारा समाधानकारक पातळीवर असल्याचे चित्र आहे. महाराष्ट्रासह प्रमुख साखर उत्पादक राज्यांमध्ये उसाची गुणवत्ता चांगली असल्याने उताऱ्यावर सकारात्मक परिणाम होत आहे. राज्याचा विचार करता, आतापर्यंत ९.१० टक्के साखर उतारा मिळालेला आहे. राज्यात सध्या २०६ सहकारी व खासगी साखर कारखाने कार्यरत असून त्यांनी आतापर्यंत ८६७ लाख टन उसाचे गाळप केले आहे. या गाळपातून ७८.९५ लाख टन साखरेचे उत्पादन झाले आहे.

मागील वर्षीच्या साखर हंगामाशी तुलना केली असता यंदाची कामगिरी अधिक चांगली ठरत आहे. गेल्या वर्षी याच कालावधीत राज्यात १९३ साखर कारखाने सुरू होते. त्यांनी ६१६ लाख टन उसाचे गाळप करून त्यातून ५५.५५ लाख टन साखर उत्पादित केली होती. त्या तुलनेत यंदा कारखान्यांची संख्या, गाळपाचे प्रमाण तसेच साखर उत्पादन या तिन्ही बाबींमध्ये वाढ झाल्याचे स्पष्ट होते.

राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे कार्यकारी संचालक प्रकाश नाईकनवरे यांनी दिलेल्या माहितीनुसार, महाराष्ट्रातील बहुतांश साखर कारखान्यांचा गाळप हंगाम मार्च अखेरीस संपेल. सध्या मिळत असलेल्या साखर उताऱ्याचा विचार करता, पुढील दोन महिन्यांत राज्यात आणखी ३० लाख टन साखरेचे उत्पादन होण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली आहे.



इतर राज्यांतील परिस्थितीबाबत बोलताना नाईकनवरे यांनी सांगितले की, कर्नाटकातही साखर हंगाम मार्च अखेरपर्यंत सुरू राहण्याची शक्यता आहे. तर देशातील सर्वात मोठ्या साखर उत्पादक राज्यांपैकी एक असलेल्या उत्तर प्रदेशात साखर हंगाम मे अखेरपर्यंत सुरू राहील, असा अंदाज आहे. त्यामुळे देशभरात चालू साखर हंगामात एकूण ३०० ते ३१५ लाख टन साखरेचे उत्पादन होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

दरम्यान, केंद्र सरकारच्या इथेनॉल मिश्रण धोरणाअंतर्गत अतिरिक्त साखरेपैकी सुमारे ३५ लाख टन साखर इथेनॉल निर्मितीकडे वळविण्यात येणार आहे. त्यामुळे थेट बाजारात येणाऱ्या साखरेचे प्रमाण मर्यादित राहण्यास मदत होणार आहे.

साखर आणि इथेनॉल या दोन्हीचा एकत्रित विचार करता, चालू हंगामात देशभरात ३३५ ते ३५० लाख टन साखरेइतके एकूण उत्पादन होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

एकूणच, यंदाचा साखर हंगाम साखर उद्योगासाठी समाधानकारक ठरत असून, चांगला साखर उतारा, वाढलेले उत्पादन आणि इथेनॉलकडे वळवलेली अतिरिक्त साखर यामुळे बाजारातील समतोल राखण्यास मदत होणार असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

# भाजपा गटनेतेपदी प्रशांत शितोळे!

## प्रदेशाध्यक्षांची गट नोंदणीस मंजुरी; शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांची माहिती

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ मध्ये भारतीय जनता पार्टीचे एकूण ८४ नगरसेवक निवडून आले आहेत. या सर्व नगरसेवकांची बैठक दि. ३० जानेवारी २०२६ रोजी पार पडली. या बैठकीत सोबत जोडलेल्या यादीनुसार नमूद केलेल्या नगरसेवकांनी भारतीय जनता पार्टी गटास एकत्रित मान्यता देत एकमताने ठराव मंजूर केला आहे, तसे पत्र महापालिका प्रशासनाला पाठवले आहे, अशी माहिती भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी दिली.**





शुक्रवारी झालेल्या बैठकीला आमदार महेश लांडगे, आमदार शंकर जगताप, विधान परिषदेचे आमदार अमित गोरखे, आमदार उमा खापरे यांच्यासह कार्यकारिणीचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी 'पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी गट' या नावाने अधिकृत गट स्थापन करण्याचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला. तसेच प्रभाग क्रमांक ३२-ड मधून निवडून आलेले नगरसेवक प्रशांत कृष्णराव शितोळे यांची भाजपा गटनेतेपदी एकमताने निवड करण्यात आली.

सदर गटाची नोंदणी विभागीय आयुक्त, पुणे तसेच आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्याकडे करण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला. त्यानुसार भारतीय जनता पार्टीच्या ८४ नगरसेवकांच्या 'पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी गट' नोंदणीस भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी पक्षाची अधिकृत मान्यता दिली आहे. भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी नवनिर्वाचित गटनेते प्रशांत शितोळे यांचे अभिनंदन केले आणि पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.

> "पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेमध्ये भारतीय जनता पार्टीचा ८४ नगरसेवकांचा भक्कम गट स्थापन झाला असून, गटनेतेपदी प्रशांत शितोळे यांची एकमताने निवड ही पक्षातील संघटनात्मक एकजुटीचे प्रतीक आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेश नेतृत्वाच्या मार्गदर्शनाखाली हा गट शहराच्या सर्वांगीण विकासासाठी, पारदर्शक प्रशासनासाठी आणि नागरिकांच्या हितासाठी ठामपणे काम करेल."
>
> - शत्रुघ्न काटे, **शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

# राष्ट्रवादीतर्फे आयोजित सर्वपक्षीय शोकसभेत "सुसंस्कृत राजकारणाचे दर्शन"

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**राज्याचे लोकनेते तथा उपमुख्यमंत्री दिवंगत अजितदादा पवार यांच्या अकाली निधनाने संपूर्ण महाराष्ट्रावर शोककळा पसरली आहे. पिंपरी-चिंचवड शहरावर अजितदादांचे पुत्रवत प्रेम होते. त्यांच्या निधानानंतर शहरात सर्वपक्षीय लोकप्रतिनिधी आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये शोकसभा झाली. या शोकसभेत "सुसंस्कृत राजकारणाचे दर्शन" घडले.**



उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे दि.28 जानेवारी 2026 रोजी सकाळी विमान अपघातामध्ये निधन झाले. त्यानंतर शुक्रवारी प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या पुढाकाराने सर्वपक्षीय विविध सामाजिक संस्था, संघटनांची शोकसभा घेण्यात आली.

यावेळी शहरातील विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. ज्येष्ठ पत्रकार संजय आवटे यांच्या भाषणाने शोकसभेची सांगता झाली. पिंपरी-चिंचवड शहरासह राज्याच्या विकासात प्रचंड योगदान असलेल्या नेत्याला श्रद्धांजली वाहण्यासाठी प्रेक्षागृह भरले होते. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर दु:ख होते. सर्वपक्षीय राजकीय लोकप्रतिनिधी आणि विविध क्षेत्रातील नागरिकांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

सुसंस्कृत राजकारणाचे दर्शन घडवले, राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्याने हे जपले पाहिजे, अशी प्रतिक्रिया निश्चितच सभागृहात आणि

### माजी आमदार विलास लांडे 'अबोल'!

शहराचे नेते माजी आमदार विलास लांडे आणि अजितदादा पवार यांची मैत्री सर्वश्रुत आहे. अत्यंत मिश्कील शब्दांत अनेकदा विलास लांडे यांचा जाहीर सभेत उल्लेख करीत अजितदादा हशा पिकवताना शहरवासीयांनी पाहिले आहेत. पवार कुटुंबियांशी कायम एकनिष्ठ असलेले विलास लांडे शोकसभेत "अबोल" राहीले. सर्व मान्यवरांची भाषणे विलासशेठ ऐकत होते. आपल्या लाडक्या नेत्याबाबत बोलण्यासाठी त्यांचा शब्द फुटला नाही.

### "अजित सृष्टी" उभारण्याच्या प्रस्तावाला सर्वपक्षीयांचे समर्थन

महाराष्ट्राच्या जडणघडणीत मोलाचे योगदान देणारे लोकनेते, उपमुख्यमंत्री दिवंगत अजितदादा पवार यांच्या स्मरणार्थ पिंपरी-चिंचवड नवीन प्रशासकीय इमारतीच्या आवारात भव्य स्मारक उभारण्यात यावे, अशी आग्रही मागणी भाजपा नेते, आमदार महेश लांडगे यांनी केली. त्यानुसार प्राथमिक बैठक घेवून कामही सुरू केले. या प्रस्तावाला शोकसभेत सर्वपक्षीय नेत्यांनी समर्थन दर्शवले. किंबहुना शहराला विकासामध्ये एक नंबर बनवण्याचे स्वप्न अजितदादांनी पाहिले होते. ते स्वप्न पूर्ण करण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करण्याचा संकल्प शहरवासीयांनी केला आहे.

### महेश लांडगे यांनी 40 सेकंदात मंच सोडला

नुकत्याच झालेल्या महापालिका निवडणुकीत पिंपरी चिंचवडवर अधिराज्य गाजविण्यासाठी महेश लांडगे आणि अजित पवार यांच्यात जोरदार वाकयुद्ध रंगले. या राजकीय लढाईत महेश लांडगे यांची सरशी झाली. परंतु निवडणूक निकालानंतर पंधरा दिवसांतच अजित पवार यांचे अपघाती निधन झाल्याने राज्यावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. अजित पवार यांना श्रद्धांजली वाहताना पहाडासारखे खमके नेते महेश लांडगे देखील अत्यंत भावुक झाले. "दादा मला माफ करा..", असे म्हणत त्यांनी केवळ 40 सेकंदात मंच सोडला.

# ‘प्रगती’साठी मानसिक अडथळ्यांचा चक्रव्यूह भेदायलाच हवा




## भूमिका

**आपले विचार, आपले आरोग्य आणि आपला आनंदसुद्धा आपल्या मनातच असतो. हे सगळं प्राप्त करायचे असेल तर सर्वप्रथम मन ‘प्रसन्न’ असायला हवे. पण प्रत्यक्षात असे आढळून येते की आयुष्यात हवे ते मिळवण्याच्या मार्गात मन फार मोठा अडथळा ठरते आहे. सकारात्मक वृत्ती, सकारात्मक विचार हे सारे ‘मनावर’ घेतले तर यश, आनंद, वैभव आणि प्रेम मिळवता येऊ शकतं.**

पण मनाचा ताबा जर राग, द्वेष, सूड, मत्सर, लालसा आणि अहंकार यांनी घेतला तर मात्र आयुष्याची दारुण शोकांतिका होण्यास फारसा वेळ लागत नाही. निर्णय घेणे हा जीवनाचा एक महत्त्वाचा भाग आहे, जो व्यक्तिगत प्रगती, करिअर उन्नती आणि एकूणच कल्याणावर प्रभाव टाकतो. मात्र, अनेक लोक मानसिक अडथळ्यांमुळे निर्णय घेण्यात अयशस्वी ठरतात. हे अडथळे संज्ञानात्मक पक्षपात, भावनिक प्रभाव आणि भीतीमुळे निर्माण होतात. या अडथळ्यांवर उपाययोजना केल्यास अधिक आत्मविश्वासाने आणि प्रभावीपणे निर्णय घेता येतात. या अडथळ्यांना सामोरे जाऊन आणि योग्य उपाययोजना करून, आपण अधिक स्पष्ट आणि आत्मविश्वासपूर्ण निर्णय घेऊ शकतो, ज्यामुळे वैयक्तिक आणि व्यावसायिक जीवनात यशस्वी होण्याची संधी वाढते. तरुणांचे स्वास्थ्य हा राष्ट्रीय विकासाचा एक मूलभूत चालक आहे, जो आर्थिक प्रगती आणि समाजाच्या निर्मितीमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावतो. विशेषत: भारतासहित अनेक देशात गेल्या काही दशकात आरोग्य, शिक्षण आणि उत्पन्नामध्ये लक्षणीय प्रगती झाली असताना, तरुणांचे मानसिक आरोग्य हे एक महत्त्वाचे क्षेत्र आहे जिथे पुढील प्रगती आवश्यक आहे असे संशोधनाअंती आढळून आले आहे. मानसिक आरोग्याच्या समस्यांचे निवारण केल्याशिवाय, हे देश संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास उद्दिष्टे द्वारे नमूद केलेली सामायिक उद्दिष्टे साध्य करू शकत नाही. विशेषत: एसडीजी 3 (सस्टेनेबल डेव्हपमेंट गोल) ज्याचे उद्दिष्ट ‘उत्तम आरोग्य आणि स्वास्थ्य’ सुनिश्चित करणे आहे. मानसिक आरोग्य हे एसडीजी 3 चा अविभाज्य घटक म्हणून ओळखले जात आहे आणि लक्ष्य 3.4 चे उद्दिष्ट मानसिक आरोग्य आणि तंदुरुस्तीला प्रोत्साहन देणे व 2030 पर्यंत असंसर्गजन्य रोगांमुळे होणारे अकाली मृत्यू एक तृतीयांश कमी करणे हे आहे. युवकांचे कल्याण, निरोगी जीवन सुनिश्चित करणे आणि सुदृढता वाढ यासाठी ध्येय निश्चिती करून यश प्राप्त करणे याला जागतिक स्तरावर प्राधान्याने काम करण्याचा संकल्प करणेत आला



आहे. 5 वर्षांखालील मृत्यू रोखण्यासारख्या क्षेत्रात प्रगती असूनही, तरुणांच्या मानसिक आरोग्य सेवांमध्ये यश मिळणे हे आव्हानात्मक झाले आहे. ‘वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन’ च्या अंदाजानुसार जगभरातील सातपैकी एक किशोरवयीन व्यक्ती मानसिक विकारांनी ग्रस्त आहे. ही विषमता कोविड-19 महामारी नंतर खूपच वाढली आहे, जागतिक स्तरावर तरुणांमध्ये चिंता, नैराश्य आणि एकलकोंडेपणाचे प्रमाण वाढले आहे. सुमारे 58 टक्के आत्महत्या वयाच्या 50 च्या आधी होतात. यातून दर्शविते की कमी आणि मध्यम उत्पन्न असलेल्या देशांमध्ये विविध वयोगटातील विशेषत: 15 ते 50 मधील वयोगटामध्ये आत्महत्या मृत्यूंचे प्रमाण अधिक आहे. या वयोगटाला मानसिक आघाडीवर सक्षम करण्यावर स्पष्टपणे लक्ष केंद्रित करणे, तसेच अनेक युवा-केंद्रित मापदंडांवर विशेष लक्ष देऊन प्रगतीसाठी मानसिक अडथळ्यांच्या चक्रव्यूहातून बाहेर पडण्याचा मार्ग सर्वांनाच पण विशेष करून युवा वर्गाला दाखवण्याची अत्यंत आवश्यकता आहे.

## प्रासंगिक »

### चतुर कोंबडी आणि लबाड कोल्हा

***एकदा एक कोल्हा अन्नाच्या शोधात एका खोपटात शिरला. तिथे त्याला एक कोंबडी दिसली; पण ती उंच माळ्यावर बसलेली होती. कोंबडीपर्यंत पोहोचता न आल्याने कोल्ह्याने युक्ती वापरण्याचे ठरवले.***

कोंबडीला थेट पकडता येणार नाही हे लक्षात येताच कोल्ह्याने युक्ती वापरण्याचे ठरवले. तो गोड बोलू लागला आणि कोंबडीची खोटी काळजी घेत असल्याचे दाखवू लागला. तिच्या आरोग्याची चौकशी करत तिला खाली उतरायला सांगू लागला. मात्र कोंबडी फारच चतुर होती. तिने कोल्ह्याचा डाव ओळखला आणि शांतपणे उत्तर दिले. आपण आजारी असून वैद्याने खाली उतरू नको असे बजावल्याचे तिने सांगितले. अशक्तपणामुळे खाली उतरल्यास प्राण धोक्यात येतील, असेही ती म्हणाली. कोंबडीची हुशारी पाहून कोल्ह्याचा डाव फसला आणि तो निराश होऊन निघून गेला. कोंबडीने आपली बुद्धी व सावधपणा वापरून स्वतःचे प्राण वाचवले.

तात्पर्य-गोड बोलणे, स्तुती किंवा खोटी काळजी दाखवणाऱ्यांच्या शब्दांना सहज भुलू नये.

उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या विमान अपघातात निधनानंतर रक्षा विसर्जन होताच सत्तेचा निर्णय घेण्याची दुर्दैवी वेळ त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांच्यावर आली आहे. राज्याचे उपमुख्यमंत्रीपद स्वीकारण्याची तयारी त्यांनी दर्शवली आहे.

# राष्ट्रवादीचा चेहरा सुनेत्रा पवार, मेंदू कोण?

हे एक खुले सत्य आहे की, ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी जेव्हा जेव्हा राजकारणातून निवृत्तीचा विचार केला, तेव्हा तेव्हा एखादे मोठे संकट उभे राहिले आणि त्यांना पुन्हा सक्रिय भूमिकेत यावे लागले. यावेळीही एप्रिलमध्ये राज्यसभेची मुदत संपल्यानंतर पवार निवृत्त होतील, राष्ट्रवादी काँग्रेस पुन्हा एकत्र करतील, अजित पवार यांच्या पाठीशी उभे राहून सुप्रिया सुळे यांचे केंद्रातील राजकारण स्थिर करतील, अशी अटकळ होती. मात्र नियतीने वेगळेच वळण घेतले.

उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी काकांच्या छत्रछायेखालून बाहेर पडत स्वतःचे राजकीय अस्तित्व निर्माण केले होते. त्याच काळात एका विमान अपघातात त्यांचे दुर्दैवी निधन झाले. या घटनेनंतर कुटुंबीयांना दुःख सावरण्याचीही उसंत न देता सुनेत्रा पवार यांना महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्रीपदाची जबाबदारी स्वीकारावी लागली.



पवार घराण्याच्या राजकीय परंपरेतून पाहता हा निर्णय अनपेक्षित नसला, तरी त्यामागे शरद पवारांपेक्षा प्रफुल्ल पटेल, तटकरे, भुजबळ यांसारख्या नेत्यांची भूमिका आणि भाजपचा दबाव अधिक असल्याची चर्चा आहे.

सुनेत्रा पवार राजकारणात सक्रिय नसल्या, तरी त्या पूर्णपणे अलिप्तही नव्हत्या. राष्ट्रवादीच्या एकत्रीकरणासाठी झालेल्या अनेक बैठकींना त्या अजित पवारांसोबत उपस्थित होत्या. त्यामुळे एका अर्थाने अजित पवार यांनी आपला राजकीय वारसा पत्नीकडे सोपवण्याची मानसिक तयारी आधीच केलेली होती.

मात्र अचानक आलेली ही जबाबदारी त्यांच्या खांद्यावर आली आहे.

या निर्णयानंतर राष्ट्रवादीच्या राजकारणाची दिशा काय असेल, हे स्पष्ट नाही. शरद पवार थेट सत्तेत सहभागी न होता कुटुंबीयांचे आणि पक्षातील समतोलाचे रक्षण करतील. मात्र भाजपचा प्रभाव कायम ठेवण्याचा प्रयत्न सुरू राहील. मंत्रिमंडळ विस्तार, पक्षातील पुनर्वसन, युवक नेतृत्वाचा उदय, तसेच धर्मनिरपेक्षतेचा मुद्दा या सर्वांमध्ये तिढे निर्माण होतील.

अजित पवार यांच्या निधनानंतर राष्ट्रवादीवर लादले गेलेले हे अपरिहार्य राजकारण शरद पवारांना पुन्हा मैदानात उतरायला भाग पाडेल. पुढील काळात राष्ट्रवादीचा चेहरा कोण असेल, निर्णय कुणाच्या हातात असतील आणि पक्षाचे स्वतंत्र अस्तित्व कसे टिकेल, हे प्रश्न कायम राहणार आहेत.

## ।। अभंगवाणी ।।



लोक निंदा करी, लोक स्तुती करी ।
हरीविण सुख काय मोलाचें ॥१॥

सोडिली आस मी देहभावाची ।
तुका म्हणे ठायीं ठायीं तूचि ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# राष्ट्रवादीचा अध्यक्ष मराठी असावा

## पाटील असावा पण पटेल नाही; राज ठाकरेंना संताप अनावर

महाईन्यूज । मुंबई

**अजित पवारांची राख सावडण्यात आली, त्याच दिवशी सुनेत्रा पवार या उपमुख्यमंत्री होणार याचा निर्णय झाला. त्यानंतर शनिवारीच तातडीने विधिमंडळ पक्षाची बैठक बोलावण्यात आली, त्यात सुनेत्रा पवारांची गटनेते पदी निवड करून शपथविधी पार पडला. या सगळ्या घडामोडींवर मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी संताप व्यक्त केला. राष्ट्रवादी काँग्रेसचा राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून प्रफुल पटेल यांच्या नावाची चर्चा आहे, त्यावरूनच राज ठाकरेंनी थेट हल्ला केला.**



सुनेत्रा पवार यांचा शपथविधी पार पडल्यानंतर राज ठाकरे यांनी सोशल मीडियावर एक पोस्ट केली. राज ठाकरेंनी गेल्या दोन दिवसांपासून प्रफुल पटेल, सुनील तटकरे, छगन भुजबळ यांच्याकडून ऐन सूतकाच्या काळात सुरू असलेल्या भेटीगाठींवर टीका केली. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदासाठी प्रफुल पटेल इच्छुक असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. त्यावरही राज ठाकरेंनी रोखठोक शब्दात भूमिका मांडली आहे. आमदार अमोल मिटकरी भूमिका मांडताना म्हणाले की, "दोन्ही पक्ष एकत्र यावे अशी माझीही इच्छा आहे. पक्ष एकत्र असायलाच हवा. शरद पवार आणि आम्ही एकत्र असायलाच हवे. पक्ष एकत्र असला म्हणजे दुसरे लोक पक्षात घुसखोरी करणार नाहीत. एवढेच नाही तर स्वराज्य दुर्लक्षित झालं, तर दुसरेच येऊन राज्य करतात", असे विधान त्यांनी केले.

### जे सुरूये त्यावर बोलावंच लागेल

राज ठाकरे म्हणाले, "महाराष्ट्राच्या राजकारणाचा गेल्या काही काळात पार विचका झाला आहे त्यावर खरंतर भाष्य पण करावं असं वाटत नाही. पण तरीही आज दिवसभर ज्या घडामोडी सुरु आहेत त्यावर बोलावंच लागेल", अशा शब्दात राज ठाकरेंनी सुनावले.

### दुर्लक्ष झालं तर दुसरेच राज्य करतात

सुनेत्रा पवार यांच्या शपथविधीनंतर एका वृत्तवाहिनीशी बोलताना आमदार अमोल मिटकरी यांनी एक महत्त्वाचं आणि मोठं विधान केले. त्यांनी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलिनीकरणाच्या मुद्द्यावर भूमिका मांडली.

# त्यांना शुभेच्छा तरी कशा द्याव्यात? - रोहित पवार

महाईन्यूज । मुंबई

**अजित पवारांचे निधन झाल्यानंतर चौथ्या दिवशी त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांना उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घ्यावी लागली. पक्षाच्या मागणीनंतर सुनेत्रा पवार यांना या कठीण परिस्थितीचा सामना करावा लागला. त्यातच राष्ट्रवादीच्या दोन गटातील विलीनीकरणाच्या चर्चेमुळे हा निर्णय आणखी कसोटीचा ठरला. शरद पवारांचा राष्ट्रवादी गट आणि उर्वरित पवार कुटुंबाला या निर्णयाबाबत विश्वासात घेतले नसल्याचा मुद्दाही समोर आला. या पार्श्वभूमीवर पवार कुटुंबातून कुणीही शपथविधीला उपस्थित राहिले नाही.**



"उद्या संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन आहे. त्यामुळे मला दिल्लीला जावं लागत आहे. मी थोडयाच वेळापूर्वी बारामतीहून पुण्याला आली आहे. आता माझी फ्लाईट असून मी दिल्लीला चालले आहे. कारण मी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाची सभागृह नेता असल्यामुळे मला दिल्लीला जावे लागत आहे. शपथविधीबाबत मला काही माहिती नाही. मी माहिती घेऊनच यावर बोलेन.

- सुप्रिया सुळे, खासदार, राष्ट्रवादी काँग्रेस (शप)

आता शपथविधीनंतर अजित पवारांचे पुतणे रोहित पवार यांनी एक्सवर पोस्ट टाकून आपल्या काकींना शुभेच्छा दिल्या आहेत.

आज सकाळी शरद पवार यांनी बारामती येथे पत्रकार परिषद घेऊन आजच्या शपथविधी सोहळ्याची आपल्याला कल्पना किंवा निमंत्रण नसल्याचे म्हटले. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या दोन्ही गटाच्या विलीनीकरणाची चर्चा सुरू असतानाच अजित पवारांचे अकाली निधन झाले. त्यांची शेवटची इच्छा पूर्ण करणे हीच आमची इच्छा आहे, असेही शरद पवार म्हणाले. शरद पवार यांच्या पत्रकार परिषदेमुळे आज दिवसभरात अजित पवार गटाला या प्रश्नावर उत्तर द्यावे लागले. अजित पवारांच्या निधनानंतर अवघ्या तीनच दिवसात शपथविधी सोहळा घेण्याचे आव्हान पेलत असताना विलीनीकरणाच्या प्रश्नांना तोंड देत असताना अजित पवार गटाच्या नेत्यांना तारेवरची कसरत करावी लागली. त्यातच आता रोहित पवारांनी केलेली पोस्ट चर्चत आहे. रोहित पवार म्हणाले, "राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री म्हणून मा. सुनेत्राकाकी यांनी शपथ घेतली, याचा आनंद आहे. खरं म्हणजे मा. अजितदादांची जागा कुणीच घेऊ शकत नाही पण किमान सुनेत्राकाकींच्या रुपात तरी आम्ही तिथं अजितदादांना पाहू."

# भीक मागताना लाज वाटते; पंतप्रधान शाहबाज शरीफ

## 'भीक-ए-कंगाल' पाकिस्तानच्या पंतप्रधानांचा जाहीर 'कबूलनामा'

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

"पाकिस्तानला अनेक देशांसमोर कर्जासाठी पदर पसरावा लागला असून, या आर्थिक हतबलतेमुळे देशाच्या स्वाभिमानाला ठेच पोहोचली आहे. कर्ज घेणाऱ्याची मान नेहमी झुकलेलीच असते," अशा शब्दांमध्ये पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी देशाच्या ढासळत्या आर्थिक स्थितीबाबत जाहीर कबुली दिली.



उपलब्ध आकडेवारीनुसार डिसेंबर २०२५ पर्यंत पाकिस्तानवरील एकूण विदेशी कर्जाचा बोजा ५२.३६६ अब्ज अमेरिकन डॉलर्सपर्यंत पोहोचला आहे. वाढत्या कर्जामुळे पाकिस्तानची आर्थिक कसरत अधिक तीव्र होत असतानाच, परकीय चलन साठा आणि महागाई नियंत्रणाच्या आघाडीवर काही प्रमाणात सकारात्मक संकेत दिसून येत आहेत. मध्यवर्ती बँकेने व्यक्त केलेल्या अंदाजानुसार, डिसेंबर २०२५ अखेर पाकिस्तानचा परकीय चलन साठा २० अब्ज डॉलर्सच्या विक्रमी पातळीवर पोहोचू शकतो.

अलीकडेच आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF) कडून मिळालेल्या १.२ अब्ज डॉलर्सच्या हप्त्यामुळे कर्जपरतफेडीसाठी तसेच चलन साठा वाढवण्यासाठी तात्पुरता दिलासा मिळाला आहे. दरम्यान, महागाई वाढण्याच्या संभाव्य धोक्याच्या पार्श्वभूमीवर स्टेट बँक ऑफ पाकिस्तानने मुख्य व्याजदर १०.५ टक्क्यांवर स्थिर ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. महागाई नियंत्रणात ठेवणे आणि आर्थिक स्थैर्य राखणे, हे बँकेसमोरील मोठे आव्हान असल्याचे स्पष्ट होत आहे.

चालू आर्थिक वर्षात पाकिस्तानचा विकासदर (GDP) ३.७५ ते ४.७५ टक्क्यांच्या दरम्यान राहण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. मात्र, वाढते कर्ज, वित्तीय तूट आणि आयातीवरील अवलंबित्व यामुळे अर्थव्यवस्थेवरील दबाव कायम आहे. IMF च्या मदतीमुळे तात्पुरता श्वास मिळाला असला, तरी दीर्घकालीन आर्थिक सुधारणा आणि संरचनात्मक बदलांशिवाय पाकिस्तानच्या आर्थिक अडचणी सुटणे कठीण असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून (IMF) अब्जावधी डॉलर्सची मदत मिळावी यासाठी आपण स्वतः अनेक अधिकाऱ्यांसह विविध देशांचे दौरे केल्याचेही शरीफ यांनी यावेळी स्पष्ट केले.

### कर्जाचा डोंगर वाढला

उपलब्ध आकडेवारीनुसार, डिसेंबर २०२५ पर्यंत पाकिस्तानवरील विदेशी कर्जाचा बोजा ५२.३६६ अब्ज अमेरिकन डॉलर्स इतका झाला आहे. डिसेंबरपर्यंत पाकिस्तानचा परकीय चलन साठा २० अब्ज डॉलर्सच्या विक्रमी पातळीवर पोहोचेल, असा अंदाज मध्यवर्ती बँकेने वर्तवला आहे. पाकिस्तानला अलीकडेच IMF कडून १.२ अब्ज डॉलर्सचा हप्ता मिळाला असून, यामुळे कर्ज परतफेड आणि चलन साठा वाढवण्यास मदत झाली आहे. स्टेट बँक ऑफ पाकिस्तानने महागाई वाढण्याच्या भीतीने मुख्य व्याजदर १०.५% वर स्थिर ठेवला आहे. चालू आर्थिक वर्षात विकासदर (GDP) ३.७५% ते ४.७५% राहण्याचा अंदाज आहे.

# आजचे करिअरचे निर्णय उद्याच्या गोव्याला आकार देतील; डॉ. प्रमोद सावंत

**महाईन्यूज । पणजी**

कामगार व रोजगार विभागाच्या वतीने डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी इनडोअर स्टेडियम, बांबोळी येथे करिअर कॉन्क्लेव्ह २०२६ चे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांना व युवकांना करिअर नियोजन, कौशल्य विकास तसेच उदयोन्मुख रोजगार संधींबाबत मार्गदर्शन देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.



दिवसभर चाललेल्या या कॉन्क्लेव्हमध्ये तज्ज्ञांचे मार्गदर्शनपर सत्र, संवादात्मक चर्चा तसेच विविध करिअर पर्याय, स्टार्ट-अप्स, स्वयंरोजगाराच्या संधी आणि शासकीय योजनांची माहिती देण्यात आली. या मंचामुळे विद्यार्थ्यांना तज्ज्ञांशी थेट संवाद साधण्याची संधी मिळाली, उद्योगांच्या गरजा समजून घेता आल्या तसेच पारंपरिक आणि नव्या क्षेत्रांतील संधींचा शोध घेता आला. यावेळी बोलताना मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी सांगितले की, भारत हा जगातील सर्वात तरुण देश असून युवकांची संख्या मोठी असल्यामुळे राष्ट्रनिर्मितीत त्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. स्वामी विवेकानंद यांच्या विचारांचा उल्लेख करत त्यांनी सांगितले की, आज विद्यार्थी जे निर्णय घेतात, तेच त्यांचे भविष्य घडवतात. कृत्रिम बुद्धिमत्ता, रोबोटिक्स, डेटा सायन्स, सायबर सुरक्षा, डिजिटल मीडिया आणि नवीकरणीय ऊर्जा यांसारख्या क्षेत्रांमध्ये झपाट्याने वाढ होत असल्याचे त्यांनी नमूद केले. आजच्या काळात केवळ पदव्या नव्हे, तर सातत्यपूर्ण शिक्षण, बदलांशी जुळवून घेण्याची क्षमता आणि प्रत्यक्ष कौशल्येही रोजगारक्षमतेसाठी आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. विद्यार्थ्यांनी अद्ययावत राहावे, तंत्रज्ञानाचा योग्य वापर करावा आणि सुज्ञ करिअर निर्णय घ्यावेत, असे आवाहन त्यांनी केले. या कार्यक्रमास कामगार व रोजगार मंत्री मा. श्री. अतानासियो मोन्सेरात, आयएएस आयुक्त-सह-सचिव श्री. संदीप जॅक्स, कामगार व रोजगार आयुक्त श्री. राजेश एस. अजगावकर तसेच अन्य मान्यवर, अधिकारी, तज्ज्ञ आणि विद्यार्थी उपस्थित होते.

### रोजगार योजना तसेच अप्रेंटिसशिप धोरणाने युवकांना पाठबळ

मुख्यमंत्र्यांनी पुढे सांगितले की, राज्य सरकार युवकांना सक्षम करण्यासाठी कौशल्य, पुनःकौशल्य आणि उन्नत कौशल्य (स्किल, रिस्किल, अपस्किल) उपक्रमांवर सातत्याने भर देत आहे. मुख्यमंत्री रोजगार योजना तसेच गोवा मुख्यमंत्री अप्रेंटिसशिप धोरण यांसारख्या योजनांचा उल्लेख करत त्यांनी या योजनांद्वारे युवकांना उद्योगांमध्ये प्रत्यक्ष अनुभव व रोजगार सहाय्य दिले जात असल्याचे स्पष्ट केले. विकसित गोवा या दृष्टीकोनावर भर देत विद्यार्थ्यांनी सरकारकडून उपलब्ध करून देण्यात आलेल्या संधी व मंचांचा पुरेपूर लाभ घ्यावा, असे त्यांनी सांगितले.

# मर्दानी 3 ला मिळाली बंपर ओपनिंग!

प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला प्रदर्शित झालेला बॉर्डर २ चित्रपट बॉक्स ऑफिसवर धुराळा घालत आहे. बॉर्ड २ ने २७५ कोटींहून अधिकचे बॉक्स ऑफिस कलेक्शन गोळा केले असून, लवकरच ३५० कोटींच्या घरात ही रक्कम जाणार असल्याचे सांगितले जात आहे. या सगळ्यात ३० जानेवारी या दिवशी अभिनेत्री राणी मुखर्जीची मुख्य भूमिका असलेला मर्दानी ३ (MARDAANI 3) प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटाने पहिल्याच दिवशी चांगले बॉक्स ऑफिस कलेक्शन गोळा केले आहे. सध्या चित्रपटागृहात बॉर्डर २ धुमाकूळ घालत असून, या चित्रपटाला प्रेक्षकांचे उंदड प्रेम मिळताना दिसत आहे. त्यामुळे मर्दानी ३ चे प्रदर्शन पुढे ढकलण्यात येईल, अशी चर्चा होती. मात्र, या चित्रपटाच्या टीमने धाडस दाखवत हा चित्रपट ३० जानेवारीलाच प्रदर्शित करण्याचे ठरवले आणि चित्रपटाला पहिल्याच दिवशी प्रेक्षकांनी चांगली पसंती दर्शवली आहे.



## आधीसारखं राहणं शक्य नाही...

बॉलीवूडमधील आघाडीची अभिनेत्री आलिया भट्ट आज अभिनयाच्या जोरावर इंडस्ट्रीतील सर्वात यशस्वी अभिनेत्रींमध्ये गणली जाते. वैयक्तिक आयुष्यात ती अभिनेता रणबीर कपूरची पत्नी आणि लाडकी मुलगी राहाची आई आहे. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत आलियाने मातृत्वानंतर आयुष्यात झालेल्या बदलांबद्दल आणि सोशल मीडियाविषयीच्या दबावाबद्दल मोकळेपणाने भाष्य केलं आहे. मुलाखतीदरम्यान “आई झाल्यानंतर काय बदल जाणवला?” या प्रश्नावर आलियाने सांगितलं की, गर्भधारणेच्या नऊ महिन्यांत शरीर आणि विचारसरणी बदलते, पण खरा बदल बाळ जन्माला आल्यानंतर जाणवतो. तिच्या मते, “एकदा बाळ आयुष्यात आलं की माणूस आधीसारखा राहूच शकत नाही.” हा बदल फक्त शारीरिक नसून भावनिक आणि मानसिक पातळीवरही खूप खोलवर परिणाम करणारा असतो, असं तिने स्पष्ट केलं. मुलाखतीदरम्यान “आई झाल्यानंतर काय बदल जाणवला?” या प्रश्नावर आलियाने सांगितलं की, गर्भधारणेच्या नऊ महिन्यांत शरीर आणि विचारसरणी बदलते, पण खरा बदल बाळ जन्माला आल्यानंतर जाणवतो. तिच्या मते, “एकदा बाळ आयुष्यात आलं की माणूस आधीसारखा राहूच शकत नाही.” हा बदल फक्त शारीरिक नसून भावनिक आणि मानसिक पातळीवरही खूप खोलवर परिणाम करणारा असतो, असं तिने स्पष्ट केलं. आलिया स्वभावाने खूप प्रायव्हेट असल्याचं तिने सांगितलं. आपलं वैयक्तिक आयुष्य सतत लोकांसमोर मांडणं तिला सहज जमत नाही. तिच्या मोबाईलमधली फोटो गॅलरी आता पूर्णपणे राहाच्या फोटोने भरलेली आहे. स्वतःचे फोटो काढण्यासाठी तिला वेगळी मेहनत घ्यावी लागते, असंही ती हसत सांगते. यावरूनच मातृत्वानंतर तिच्या प्राथमिकता पूर्णपणे बदलल्या असल्याचं दिसून येतं.



## मी कधीही असे दिसू इच्छित नाही...



पंजाबी इंडस्ट्रीतील आपली ओळख निर्माण केल्यानंतर प्रसिद्ध अभिनेत्री सोनव बाजवाने आपला मोर्चा आता बॉलिवूड इंडस्ट्रीकडे वळवला आहे. तिने अनेक बॉलिवूडमधील अनेक चित्रपटात काम करत लोकप्रियता मिळवली आहे. ती सोशल मीडियावर सतत सक्रीय असते. तिच्या सोशल मीडिया वरील पोस्ट चाहत्यांना भुरळ घालणाऱ्या असतात. अभिनेत्रीने पंजाबी इंडस्ट्रीतून बॉलिवूडमध्ये पदार्पण करताना तिने अनेक चढ उतार पाहिले आहेत. तिच्या सौंदर्याचे आणि अभिनयाचे तिचे चाहते कौतुक करत असतात. अभिनेत्रीने गुरुवारी तिच्या सोशल मीडिया अकाउंटवरून एक ब्लॅक अँड व्हाइट फोटो शेअर केला. फोटो साधेपणाने भरलेला होता, जो चाहत्यांना खूप आवडला. पोस्टमध्ये तिने दिलेले कॅप्शन चाहत्यांना आकर्षित करणारे ठरले आहे. तिने पोस्टमध्ये लिहिले आहे की, “मी कधीही असे दिसू इच्छित नाही की माझे आयुष्य पूर्णपणे परिपूर्ण आहे, तर ते नेहमीच असे दिसते की हे सर्व देवाची कृपा आहे आणि त्याने सर्वकाही सांभाळले आहे.” या पोस्टवर चाहते तिचे कौतुक करत आहेत आणि तिचे शब्द प्रेरणा देणारे असल्याचे म्हणत आहेत. ‘बॉर्डर २‘ मध्ये सोनमने साकारलेल्या पात्राचे कौतुक होत आहे. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर आत्तापर्यंत २९५ कोटींपेक्षा जास्त कमाई करून क्रेझ निर्माण केली आहे. सध्या अभिनेत्री सोनम बाजवा (SONAM BAJWA) तिच्या आगामी चित्रपटात व्यस्त आहे. हाऊसफुल ५ या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये सोनमने पदार्पण केले. त्यानंतर ती बागी ४ मध्ये झळकली होती. याशिवाय तिने ‘एक दीवाने की दीवानियात’ या चित्रपटात मुख्य अभिनेत्रीची भूमिका साकारली आहे. तसेच ती अनेक बॉलिवूड चित्रपटांमध्येही झळकली आहे. अभिनेत्री सोनम बाजवाने बॉलिवूडमध्ये आपले स्थान कायम ठेवले असून, तिच्या चाहत्यांची संख्या मोठी आहे.

## भूमि पेडणेकरने सोशल मीडिया वापराविषयी व्यक्त केले मत

गुन्हेगारी विश्वावर आधारित ‘दलदल’ ही नवीकोरी वेबसिरीज नुकतीच अमेझॉन प्राइमवर रिलीज झाली आहे.या वेबसिरीजमध्ये भूमी पेडणेकरने साकारलेल्या भूमिकेची प्रेक्षकांकडून प्रशंसा केली जात आहे. मानसिक अस्वस्था आणि त्यातून घडणारी अंगावर काटा आणणारी कथा या वेबसिरीज पाहिला मिळते. या वेबसिरीजच्या नावातच कथा कशावर आधारित असू शकते याचा अंदाच लावता येतो. या वेबसिरीजचे जोरदार प्रमोशन भूमि करताना (BHUMI PADNEKAR) दिसत आहे. नुकतेच तिने एका वाहिनीला मुलाखत दिली. या मुलाखतीत तिला तिच्या सर्वात मोठ्या दलदलविषयी विचारण्यात आले. यावर भूमी म्हणाली, “माझी सर्वात मोठी दलदली म्हणजे इंटरनेट स्क्रोलिंग. सोशल मीडिया वापरताना किती वेळ निघून गेला हे मला कळतही नाही. ही सवय मला सोडायची असून मी हळूहळू ती बदलत असल्याचे भूमिने स्पष्ट केले. आज सोशल मीडिया एक खूप भयानक जागा बनली आहे. सोशल मीडियावर एखाद्याबद्दल काहीतरी नकारात्मक बोलले गेले तर इतर लोक ते पुन्हा पुन्हा सांगू लागतात आणि ती गोष्ट एक ट्रेंड बनते. लोकांनी जागरूक राहणे आणि या दलदलीतून स्वतःला बाहेर काढणे महत्वाचे असल्याचे भूमि पेडणेकरने सांगितले. दलदल ही वेबसिरीज ३० जानेवारी या दिवशी अमेझॉन प्राइमवर प्रदर्शित झाली आहे. या वेबसिरीजमध्ये भूमी पेडणेकर मुख्य भूमिकेत आहे, तर समारा तिजोरी आणि आदित्य रावल या कलाकारांच्या देखील महत्त्वपूर्ण भूमिका आहेत. जया भट्टाचार्य, चिन्मय मांडलेकर, गीता अग्रवाल, संदीप कुलकर्णी, सौरभ गोयल सारखे इतर सहाय्यक पात्र देखील या वेबसिरीजमध्ये लक्ष वेधून घेणाऱ्या भूमिकेत आहेत.



# वर्ल्डकप पूर्वी ऑस्ट्रेलियाला मोठा धक्का

## ऑस्ट्रेलियाच्या संघात फेरबदल; रेनशॉची एन्ट्री, हेझलवूड-डेव्हिड-एलिस फिट

**महाईन्यूज । मुंबई**

**टी-२० विश्वचषक २०२६ अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. सर्वच संघ या मोठ्या स्पर्धेसाठी कसून सराव करत आहेत. पण स्पर्धा सुरू होण्यापूर्वीच ऑस्ट्रेलियाला मोठा धक्का बसला आहे. संघाचा महत्त्वाचा वेगवान गोलंदाज व कर्णधारच स्पर्धेतून बाहेर झाला आहे. त्यामुळे आता ऑस्ट्रेलियाच्या टी-२० वर्ल्डकप संघातही मोठे बदल झाले आहेत.**




### टी-२० विश्वचषकसाठी ऑस्ट्रेलियाचा संघ

मिचेल मार्श (कर्णधार), झेवियर बार्टलेट, कूपर कॉनोली, टिम डेव्हिड, बेन द्वारशुइस, कॅमेरून ग्रीन, नॅथन एलिस, ट्रॅव्हिस हेड, जोश इंग्लिस, जोश हेझलवूड, मॅथ्यू कुनहेमन, ग्लेन मॅक्सवेल, मॅट रेनशॉ, मार्कस स्टोइनिस, ॲडम झाम्पा

ऑस्ट्रेलियाच्या संघात आणखी एक बदल करण्यात आला आहे. मॅथ्यू शॉर्टला वगळण्यात आले आहे आणि त्याच्या जागी फॉर्मात असलेल्या मॅट रेनशॉला संघात स्थान देण्यात आलं आहे. स्टीव्ह स्मिथलाही या विश्वचषकासाठी संघातून वगळण्यात आलं आहे. जोश हेझलवूड, टिम डेव्हिड आणि नॅथन एलिस हे सर्वजण विश्वचषक खेळण्यासाठी फिट घोषित करण्यात आलं आहे.

हेझलवूडला ॲशेसपूर्वी हॅमस्ट्रिंगची दुखापत झाली होती. ज्यामुळे तो बराच काळ संघाबाहेर होता. हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीमुळे डेव्हिड बीबीएल सामने आणि पाकिस्तान मालिकेला मुकला, तर एलिस हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीमुळे बीबीएल अंतिम फेरी आणि पाकिस्तान दौऱ्याला मुकला होता. पण हे तिघेही फिट होऊन संघात परतले आहेत.

पॅट कमिन्स गेल्या बऱ्याच काळापासून पाठीच्या दुखापतीने त्रस्त आहे. ज्यामुळे चॅम्पियन्स ट्रॉफी, ॲशेस मालिका आणि आता टी-२० विश्वचषकाला तो मुकणार आहे. पॅट कमिन्सच्या जागी बेन द्वारशुईसला संघात संधी देण्यात आली आहे. पॅट कमिन्सच्या जागी बेन द्वारशुइसला संघात आणण्याबाबत ऑस्ट्रेलियन निवडकर्त्यांनी सांगितलं की तो संघाला डावखुरा वेगवान गोलंदाजाचा पर्याय देईल. तो एक चांगला क्षेत्ररक्षक देखील आहे आणि अखेरच्या षटकांमध्ये काही धावा करू शकतो.

बेन द्वारशुइसने ऑस्ट्रेलियासाठी १३ टी-२० सामने खेळले आहेत, ज्यामध्ये त्याने २० विकेट्स घेतल्या आहेत. त्याने शेवटचा टी-२० सामना नोव्हेंबर २०२५ मध्ये ब्रिस्बेन येथे भारताविरुद्ध खेळला होता. मॅट रेनशॉने फक्त एकच टी-२० सामना खेळला आहे. या वर्षी २९ जानेवारी रोजी लाहोरमध्ये पाकिस्तानविरुद्ध त्याने टी-२० मध्ये पदार्पण केलं.

ऑस्ट्रेलियाचा संघ ११ फेब्रुवारी रोजी आयर्लंडविरुद्धच्या सामन्याने टी-२० वर्ल्डकप मोहिमेची सुरुवात करेल. त्यांचा पुढील सामना १३ फेब्रुवारी रोजी झिम्बाब्वेविरुद्ध होईल. ऑस्ट्रेलिया त्यांचे सुरुवातीचे दोन सामने कोलंबोमध्ये खेळेल.

त्यानंतर, त्यांचा सामना १६ फेब्रुवारी रोजी पल्लेकेले स्टेडियमवर श्रीलंकेशी होईल. ऑस्ट्रेलिया त्यांचा शेवटचा सामना २० फेब्रुवारी रोजी ओमानविरुद्ध खेळेल.

# मुंबई इंडियन्सकडे प्लेऑफ गाठण्याची अजूनही संधी

**महाईन्यूज । मुंबई**

**मुंबई इंडियन्सला गट टप्प्यातील अखेरच्या सामन्यात गुजरात जायंट्सकडून ११ धावांनी पराभव पत्करावा लागला. मुंबई इंडियन्सचा पराभव करत गुजरात संघाने प्लेऑफमध्ये धडक मारली. या हंगामात गतविजेत्या मुंबईचा हा पाचवा पराभव आहे. प्लेऑफसाठी सध्या एकच जागा शिल्लक असताना यासाठी अजूनही तीन दावेदार आहेत, दिल्ली कॅपिटल्स, युपी वॉरियर्ज व मुंबई इंडियन्स. मुंबईचे गट टप्प्यातील सामने संपले असले तरी आता अखेरच्या सामन्याच्या निकालासह टीम इंडिया पुढील फेरी गाठली आहे.**

मुंबई इंडियन्सने WPL 2026 मध्ये आपले सर्व गट टप्प्यातील सामने पूर्ण केले असून, संघाचे प्लेऑफमधील भवितव्य आता इतर संघांच्या निकालावर अवलंबून आहे. या हंगामात गतविजेत्या मुंबई इंडियन्सला अपेक्षित कामगिरी करता आली नाही. आठ सामन्यांपैकी केवळ तीन सामने जिंकत संघाने ६ गुणांसह गुणतालिकेत तिसरे स्थान मिळवले आहे. गट टप्प्यातील अखेरच्या सामन्यात गुजरात जायंट्सकडून पराभव पत्करावा लागल्यानंतर मुंबईसमोरील आव्हान अधिक कठीण झाले आहे.

तरीही, मुंबई इंडियन्ससाठी प्लेऑफची दारे पूर्णपणे बंद झालेली नाहीत. संघाच्या पुढील वाटचालीचा निर्णय आता दिल्ली कॅपिटल्स विरुद्ध युपी वॉरियर्ज या गट टप्प्यातील अखेरच्या सामन्यावर अवलंबून आहे. हा सामना १ फेब्रुवारी रोजी खेळवला जाणार असून, या सामन्याचा निकाल प्लेऑफचे चित्र स्पष्ट करणार आहे.

सध्याच्या गुणतालिकेनुसार, दिल्ली कॅपिटल्स आणि मुंबई इंडियन्स या दोन्ही संघांचे समान ६ गुण आहेत, तर युपी वॉरियर्ज संघ ४ गुणांसह तळाच्या स्थानावर आहे. जर युपी वॉरियर्जने या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सचा पराभव केला, तर दिल्ली, मुंबई आणि युपी या तिन्ही संघांचे प्रत्येकी ६ गुण होतील आणि त्यानंतर नेट रन रेट हा निर्णायक घटक ठरेल.

युपी वॉरियर्जला प्लेऑफमध्ये प्रवेश करण्यासाठी दिल्लीविरुद्धच सामना १५० हून अधिक धावांनी जिंकणे किंवा १८ पेक्षा अधिक षटके शिल्लक ठेवून विजय मिळवणे आवश्यक आहे. अन्यथा, दिल्लीचा पराभव झाल्यास मुंबई इंडियन्स एलिमिनेटरमध्ये प्रवेश करेल. जर दिल्ली कॅपिटल्सने युपी वॉरियर्जवर विजय मिळवला, तर दिल्ली संघ थेट प्लेऑफमध्ये धडक मारेल आणि मुंबईचे आव्हान संपुष्टात येईल.

नेट रन रेटच्या बाबतीत मुंबई इंडियन्सची स्थिती तुलनेने चांगली आहे. मुंबईचा नेट रन रेट +0.059 असून, तो दिल्ली कॅपिटल्सच्या -0.164 आणि युपी वॉरियर्जच्या -1.146 पेक्षा सरस आहे. त्यामुळे नेट रन रेटच्या आधारे मुंबईला एलिमिनेटरमध्ये स्थान मिळण्याची दाट शक्यता आहे.

दरम्यान, स्मृती मानधनाच्या नेतृत्वाखालील रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि गुजरात जायंट्स यांनी आधीच WPL 2026 च्या प्लेऑफसाठी पात्रता मिळवली आहे. आठ पैकी सहा सामने जिंकत RCB ने थेट अंतिम फेरीत स्थान निश्चित केले आहे, तर गुजरात जायंट्स एलिमिनेटरमध्ये खेळणार आहेत. एलिमिनेटरमध्ये गुजरातचा सामना कोणत्या संघाशी होईल, हे आता गट टप्प्यातील अखेरच्या सामन्यानंतर स्पष्ट होणार आहे.



स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

। रविवार।

दि. 1 फेब्रुवारी 2026।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती




# अजितदादांनी माध्यमांचे स्वातंत्र्य जपले!

## शोकसभेत आदरांजली : शहरातील पत्रकारांच्या भावना

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या माध्यमांचे स्वातंत्र्य जपले अशा भावना पिंपरी चिंचवड शहर पत्रकारांनी व्यक्त केल्या. कितीही कठोर प्रश्न विचारले किंवा माध्यमातून लिखाण केले तरी पत्रकार बांधवांवर दबाव आणणे अथवा जाब विचारण्याचे प्रकार पवारांनी केला होता नाही. असे माध्यम स्वातंत्र्य जपणारा, विकासाभिमूख नेतृत्वाला पिंपरी चिंचवड शहरासह राज्य मुकले अशा भावनाही माध्यम प्रतिनिधींनी व्यक्त केल्या.**

पिंपरी चिंचवड शहर पत्रकारांच्या वतीने उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. चिंचवड येथील सायन्स पार्कच्या सभागृहात पार पडलेल्या कार्यक्रमात आठवणीतले अजित पवार या विषयावर माध्यम प्रतिनिधींनी आपल्या भावना व्यक्त केल्या. या वेळी ज्येष्ठ पत्रकार अविनाश चिलेकर, विवेक इनामदार, सुनिल लांडगे, सुनिल माने, नाना कांबळे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या आठवणींना उजाळा दिला.

अविनाश चिलेकर म्हणाले की, अजित पवार यांचे आणि पत्रकारांचे नाते अतिशय सोहार्दपुर्ण होते. महापालिका निवडणुकीत अनेक वेळा विविध विषयांवर वार्तांकन केले. या वेळी अजित पवारांनी स्वीय सहायकांमार्फत थेट संपर्क करत माहिती घ्यायचे. आक्रमक आणि विरोधी बातम्या लिहिल्या तर असे का लिहिले म्हणून कधीही संपर्क करत नव्हते. त्यांच्या निधनानंतर हे राज्य मोठ्या नेत्याला मुकले आहेच. मात्र पिंपरी चिंचवड शहराचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. माध्यमातील प्रतिनिधींनी त्यांची भूमिका रोखठोक मांडणे गरजेचे आहे.

> “ज्येष्ठ पत्रकार विवेक इनामदार म्हणाले की, बातमीदारांसाठी अजित पवार न्युज मेकर होते. ते शहरात आले आणि बातमीचा विषय दिला नाही असे होत नसे. क्रिकेट मध्ये कपील देव ज्या पद्धतीने बॅटिंग करायचे. त्या पद्धतीने भाषणात अजित पवारांची शब्दफेक होती. आक्रमक भाषण हे त्यांचे वैशिष्ट्ये होते. पत्रकारांच्या प्रश्नांवर ते हजरजबाबी पद्धतीन उत्तर देऊन हसवत होते. त्यांच्या निधनानंतर श्रद्धांजली वाहण्याची वेळ यावी, या सारखे दुःख नाही.
>
> - विवेक इनामदार, ज्येष्ठ पत्रकार.

> “पत्रकारितेच्या माध्यमातून अनेक वेळा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी बोलण्याचा संपर्क आला. त्यांच्या प्रति सांगण्यासारख्या असंख्य आठवणी आहेत. शहरातील विकासात त्यांनी दिलेले योगदान आणि केलेली विकासकामे मी जवळून अनुभवली आहेत. त्याचा साक्षिदार आहे. त्यांच्या सारखे व्हीजन कोणाकडे नाही.
>
> - सुनील लांडगे, ज्येष्ठ पत्रकार.



ज्येष्ठ पत्रकार ॲड. सुनिल माने म्हणाले की, मॉल संस्कृतीचा उदय शहरात होत असताना चटई कामगार, पथारीसारखे छोटे व्यावसायिकांची जागा शहरीकरणात काय आहे असा प्रश्न विचारणारी मी बातमी केली होती. या बातमीवर स्वतः अजित पवार यांनी संपर्क करत शहराचा विकास कसा होणे अपेक्षित आहे. सर्वच स्तरातील नागरिकांना आपण न्याय देणार असल्याची भूमिका समजावून सांगितली. बातमीवर बारीक लक्ष ठेवून स्वतः भूमिका मांडणारे ते नेतृत्व होते.

नाना कांबळे म्हणाले की, बारामती लोकसभा निवडणुकीला प्रथम अजित पवार सामोरे जाताना त्यांचे केलेले वार्तांकन पाहून त्यांनी स्वत ती गोष्ट लक्षात ठेवली होती. त्यांनी शहराच्या उभारणीत घातलेले लक्ष वाखाणण्यासारखे आहे. त्यांची भूमिका त्यांनी योग्य पद्धतीने निभावली आहे. पुढे आपल्याला त्यांची भूमिका माध्यमातून पुढे नेली पाहिजे.

या वेळी अमोल काकडे, विकास शिंदे, प्रकाश गायकर, ज्ञानेश्वर भंडारे, उमेश अनारसे, पंकज खोले, रोहित खर्गे यांनी अजित पवारांविषयी आपल्या भावना व्यक्त केल्या. अमोल शिंत्रे, संजय शिंदे, वर्षा कांबळे, अश्विनी पवार, राहुल हातोले, लिना माने, प्रशांत साळुंखे, मंगेश सोनटक्के आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन अमृता ओंबाळे यांनी केले. प्रास्ताविक प्रदीप लोखंडे यांनी केले.

# जलतरणपटू रमेश जाधव यांना राष्ट्रीय सुवर्णपदक

## क्रीडा विश्व: ८ वी राष्ट्रीय मास्टर गेम्स पोहण्याच्या स्पर्धा

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**सुपर मास्टर गेम्स अँड स्पोर्ट्स फेडरेशन यांच्या वतीने महाराष्ट्रात प्रथमच पिंपरी चिंचवड येथे ८ व्या राष्ट्रीय मास्टर गेम्स स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये सांघिक व वैयक्तिक एकूण २३ खेळांचा समावेश आहे. पोहण्याच्या स्पर्धा २८ आणि २९ जानेवारी रोजी पिंपरी येथील आण्णासाहेब मगर स्टेडियम जलतरण तलाव मध्ये घेण्यात आल्या.**



यामध्ये ७० वर्ष पुढील पुरुष वयोगटातील पोहण्याच्या स्पर्धेत महाराष्ट्र, पुणे, मोशी येथील केंद्रीय विहार सोसायटीतील ज्येष्ठ नागरिक रमेश जाधव (वय ७३ वर्ष) यांनी राष्ट्रीय पातळीवरील अंतिम फेरीमध्ये एका सुवर्ण पदकासह एकूण ४ पदकांची कमाई केली. रमेश जाधव यांनी २०० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक मध्ये सुवर्ण पदक, २०० मीटर फ्री स्टाईल मध्ये रौप्य पदक आणि फ्री स्टाईल १०० मीटर व ५० मीटर मध्ये ताम्र पदक पटकावले.

सुपर मास्टर गेम्स अँड स्पोर्ट्स फेडरेशनचे कार्यकारी अधिकारी विनोद कुमार, महाराष्ट्र अध्यक्ष रामसिंग संघा, सरचिटणीस शैलेश फुलसुंगे यांच्या हस्ते रमेश जाधव यांना पदक देऊन गौरविण्यात आले. पोहण्याच्या स्पर्धेत ७० वर्षांपुढील पुरुष वयोगटात एकूण चार पदकांची कमाई करणारे रमेश जाधव हे महाराष्ट्रातील एकमेव स्पर्धक आहेत. पुढील वर्षी जपान येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय मास्टर गेम्स स्पर्धेत रमेश जाधव यांचा प्रवेश निश्चित झाला आहे.




### कोण आहेत रमेश जाधव?

रमेश जाधव हे केंद्र सरकारच्या भारतीय ऊस संशोधन लखनऊ संचालित प्रवरानगर येथील जैविक नियंत्रण केंद्रामध्ये कीटक शास्त्रज्ञ, वर्ग १, या पदावरून निवृत्त झाले आहेत. तरुण वयापासूनच त्यांना पोहण्याची आवड होती. यापूर्वी त्यांनी २००५ मध्ये प्रवरानगर येथे झालेल्या महाराष्ट्र स्टेट मास्टर अँथलेटिक्स चॅम्पियन स्पर्धेत पोहण्याच्या स्पर्धेत त्यांनी ताम्र पदक आणि २०२५ मध्ये पिंपरी चिंचवड येथे झालेल्या ६ व्या महाराष्ट्र स्टेट मास्टर गेम्स स्पर्धेमध्ये पोहण्याच्या स्पर्धेत एक सुवर्ण आणि दोन रौप्य पदके पटकावली होती.

# 'भारत अस्मिता राष्ट्रीय पुरस्कार' जाहीर!

## शिक्षण विश्व : एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीची घोषणा

**महाईन्यूज । पुणे**

**एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी व एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्नमेंटतर्फे २२ वे 'भारत अस्मिता राष्ट्रीय पुरस्कार' जाहिर करण्यात आले आहेत. भारत अस्मिता राष्ट्रीय पुरस्काराद्वारे विविध क्षेत्रांमध्ये मोलाची कामगिरी बजावणाऱ्या व्यक्तींच्या कार्याची माहिती तरुण पिढीला व्हावी व या पिढीने त्या मार्गावर चालण्याची जिद्द बाळगावी हे या पुरस्काराचे उद्दिष्ट आहे.**

या वर्षी हा पुरस्कार बंगळूर येथील आयआयएमच्या प्रा.डॉ.श्रीवर्धनी के.झा, तरुण खासदार ज्योथिमणी सेन्नमलाई, सुप्रसिद्ध अभिनेता आणि मानसोपचार तज्ज्ञ पद्मश्री डॉ. मोहन आगाशे आणि सुप्रसिद्ध शास्त्रीय संगीतकार व सरोजवादक पद्मविभूषण उस्ताद अमजद अली खान यांना प्रदान करण्यात



Dr. Srivardhini K. Jha | Ms. S. Jothimani | Dr. Mohan Agashe | Ustad Amjad Ali Khan

येणार आहे. अशी माहिती एमआयटी डब्ल्यूपीयूचे कुलगुरू डॉ. आर.एम. चिटणीस यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी एमआयटीडब्ल्यूपीयूचे चिफ बिलिफ ऑफिसर डॉ. दत्ता दंडगे उपस्थित होते. एमआयटीचे कार्याध्यक्ष व डॉ. राहुल कराड यांच्या मार्गदर्शनात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे.हा पुरस्कार प्रदान समारंभ मंगळवार, ३ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी ४.३० वा. कोथरुड येथील एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीच्या मैदानात आयोजित करण्यात आला आहे.

पुरस्कार समितीचे अध्यक्ष ज्येष्ठ शास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर, जगविख्यात संगणक तज्ज्ञ पद्मभूषण डॉ. विजय भटकर व एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा.डॉ.विश्वनाथ कराड यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. प्रत्येकी अडीच लाख रूपये रोख, सन्मानपत्र व स्मृतीचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरुप आहे.

### समर्पित व्यक्तीमत्वांचा होणार गौरव...

जागतिक दर्जाचे संशोधन व समाजावर शाश्वत प्रभाव निर्मिती आणि व्यवस्थापनाच्या क्षेत्रात आणि आंत्रप्रेन्यूअरशीपसाठी विशेष कार्य केल्याबद्दल प्रा. डॉ. श्रीवर्धनी के. झा यांना 'भारत अस्मिता आचार्य श्रेष्ठ पुरस्कार' प्रदान करण्यात येणार आहे. धडाडीच्या नेत्या व सामाजिक कार्यकर्त्या तामिळनाडू येथील तरुण खासदार ज्योथिमणी सेन्नीमलाई, यांना 'भारत अस्मिता जन प्रतिनिधी श्रेष्ठ पुरस्काराने' गौरविण्यात येईल. चित्रपट आणि वैद्यकीय क्षेत्रात केलेल्या अद्वितिय कार्याबद्दल पद्मश्री डॉ. मोहन आगाशे आणि सरोद या वाद्यासह भारतीय शास्त्रीय संगीत जगभर पसरविल्याबद्दल पद्मविभूषण उस्ताद अमजद अली खान यांना 'भारत अस्मिता जन जागरण श्रेष्ठ पुरस्काराने' गौरविण्यात येणार आहे. आपल्या आचार, विचार, कृतीने व सेवेने ज्यांनी देशाच्या नाव लौकिकात भर टाकली. विविध मार्गाने आपली अमूल्य सेवा देशाला समर्पित केली अशा व्यक्तींच्या गौरवासाठी या पुरस्काराची योजना आहे.




# Say "No" To Junk Food

## Health Is the Real Wealth

**"HEALTH IS REAL WEALTH" IS A WELL-KNOWN SAYING THAT REMINDS US OF THE IMPORTANCE OF GOOD HEALTH IN OUR LIVES. IN TODAY'S MODERN WORLD, JUNK FOOD HAS BECOME VERY POPULAR, ESPECIALLY AMONG CHILDREN AND TEENAGERS. FOOD ITEMS LIKE PIZZA, BURGERS, CHIPS, NOODLES, AND COLD DRINKS ARE EASILY AVAILABLE AND VERY TEMPTING. HOWEVER, EXCESSIVE CONSUMPTION OF JUNK FOOD HAS BECOME A SERIOUS THREAT TO OUR HEALTH.**



Junk food contains a high amount of oil, sugar, salt, and harmful chemicals. Eating such food regularly can lead to serious health problems such as obesity, stomach disorders, tooth decay, and weakness. It also reduces our energy levels and affects our concentration, which has a negative impact on our studies and daily activities.

To stay healthy, we should avoid junk food and include nutritious food in our diet. Fruits, vegetables, milk, pulses, and home-cooked meals provide essential nutrients needed for our body. Parents and teachers play an important role in guiding children about healthy eating habits. Drinking plenty of water and eating meals on time are also very important for maintaining good health.



In conclusion, junk food may look attractive and tasty, but it is harmful to our body in the long run. We should limit its intake and choose healthy food instead. By saying "no" to junk food and "yes" to nutritious food, we can stay fit, active, and lead a healthy and happy life.

**- Reeya Tiwari, Grade VIII**


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046